


www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199    Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–13  ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. सोमवार, 1 डिसेंबर 2025  ■ किंमत 2 रूपये, पाने –4

## राज्यातील २० नगरपालिकांमध्ये निवडणुका पुढे ढकलल्या

### पुणे, धाराशिव, सोलापूर, चंद्रपूरचा समावेश

**मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा अखेर बिगुल वाजला असून २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतांच्या निवडणुका संपन्न होत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर प्रचार अंतिम टप्प्यात आला असताना आता काही जिल्ह्यातील नगरपालिकांच्या निवडणुकांना, काही प्रभागातील निवडणुकांना ब्रेक लागला आहे. राज्यातील साधारण २० जिल्ह्यातील काही नगरपालिकांच्या प्रभागात निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याने कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला आहे. त्यामध्ये, पुणे , सोलापूर, चंद्रपूर, यवतमाळ, अहिल्यानगर, धाराशिव, नांदेड जिल्ह्याचा समावेश आहे. दरम्यान, राज्यात २ डिसेंबर रोजी नगरपालिका निवडणुकांसाठी मतदान होत असून ३ डिसेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे.**

निवडणुकांच्या प्रचारतोफा अंतिम टप्प्यात आल्या असताच काही नगरपालिकांतील विविध प्रभागांच्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. त्यामध्ये, सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा नगरपालिका आणि नगरसेवकपदाची निवडणूक लांबणीवर पडली असून आता २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठीचा, सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आलाय. यापूर्वी न्यायालयीन प्रक्रियेत मंगळवेढा नगरपालिकेची निवडणूक अडकली होती. नगराध्यक्षपदाच्या

उमेदवारांबाबत असणाऱ्या न्यायालयीन केसेसचे आदेश २७ नोव्हेंबरला आल्याने मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीला निवडणूक आयोगाने स्थगिती दिलेली होती. आता मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ नगरपरिषदेचीही निवडणूक लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. येथील दिग्रस पांढरकवडा आणि वणी येथील काही प्रभागांची निवडणूक लांबणीवर जाण्याची चिन्हे आहेत. ज्या ठिकाणी तांत्रिक चुका झाल्या तेथे निवडणुकीसंदर्भात निवडणूक आयोगानं नव्याने कार्यक्रम दिला असून आता निवडणुक २० डिसेंबरला होणार आहेत. निवडणूक प्रक्रिया लांबणीवर पडण्याम ागे न्यायालयीन कारण असल्याचे समोर आले आहे. याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून अद्याप कुठलीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ पैकी ४ नगरपरिषद निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. कोपरगाव, देवळाली, नेवासा आणि पाथर्डी या चार ठिकाणी नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराबद्दल कोर्टात अपील असल्याने नगरपरिषद निवडणूक पुढे ढकलली आहे. त्याबरोबरच सात नगरसेवक पदाच्या उमेदवाराबाबत कोर्टात अपील असल्याने त्या ठिकाणी देखील मतदान प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली आहे. पुढे ढकललेल्या नगरपरिषद आणि नगरसेवक पदाच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये १० डिसेंबरपर्यंत माघार घेण्यासाठी मुदत, तर २० डिसेंबर मतदान आणि २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याची माहिती आहेत.

धाराशिव – न्यायालयीन अपील दाखल झाल्यामुळे स्थगित झालेल्या धाराशिव नगरपालिकेतील तीन जागांसाठी (प्रभाग क्र. २ अ, ७ ब आणि १४ ब) अखेर सुधारित निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने २९ नोव्हेंबर रोजी उशिरा जाहीर केला. चार दिवसांपूर्वी या जागांवरील निवडणुकांना स्थगिती देण्यात आली होती. त्यामुळे उमेदवार, प्रशासन व नागरिकांचे **पान ४ वर**

## मौनगिरी सृष्टीमध्ये जगद्गुरू जनार्दन स्वामींच्या भव्य शिल्पाचे लोकार्पण



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील क्षेत्र वेरूळ येथील ब्रह्मलीन जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज यांच्या ३६ व्या पुण्यस्मरण निमित्त ओम जगद्गुरु जनशांती धर्मसोळ्याचे आयोजन श्रीक्षेत्र वेरूळ येथे उत्तर अधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या या कार्यकाळात पार पडत आहे.

प.पु.बाबाजींच्या ३६ व्या पुण्यस्म रणार्थ सुरू असलेल्या ॐ जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याच्या तिसऱ्या दिवशी श्री.बाबाजींचे उत्तराधिकारी अध्यात्म शिरोमणी जगद्गुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व प्रमुख उपस्थितीत मौनगिरी सृष्टीमध्ये श्री.बाबाजींच्या भव्य शिल्पाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी संत, मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा या वैशिष्ट्यपूर्ण सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील लाखो भाविकांनी तन मन धनाने सहभागी होऊन ब्रह्मलीन जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांचा आशीर्वाद प्राप्त करून घ्यावा असे आवाहन जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी केले. उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती यासोबत आश्रमिय संत शिवेश्वर गिरी महाराज महिंद्र गिरी महाराज व नित्यानंद महाराज हे उपस्थित होते.

## २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यातील शहीदांना महर्षी वाल्मिकी चौकात श्रध्दांजली अर्पण; अजयसिंग चावरिया यांच्याकडून आयोजन



महर्षी वाल्मिकी चौक तार भवन येथे हुतात्म्यांना श्रध्दांजली

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

२६ नोव्हेंबर रोजी २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या हुतात्म्यांना श्रध्दांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महर्षी वाल्मिकी चौक तार भवन येथे दुपारी १ वाजता क्रांती चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनिल माने यांच्या प्रमुख उपस्थितीत शहीदांना श्रध्दांजली वाहुन त्यांनी दिलेल्या बलिदान दिनावर त्यांच्या कार्याबद्दल संबोधीत करण्यात आले.

यावेळी भारतीय दलित कोब्राचे अशोक बोर्ड, निश्चील भागडा, पवन चावरिया, शेख शफिक शेख पाशा, नविन चावरिया, निखील बिडला, संजय चहावाल, अभिजीत अकोदे, करण मोरे, धिरज धारूल, वेदांत वायचळे, रोहित बिडलान, प्रथमेश हटवाल, अतिका मिसाळ, रोहण चावरिया आदि नागरिकांनी श्रद्धांजली अर्पण केली.

कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी अजय चावरिया यांनी परिश्रम घेतले. अजय चावरिया हे एक समाज सेवक असून त्यांच्याकडून वेळोवेळी सामाजिक उपक्रम आयोजित केले जातात. कार्यक्रम शांततेत मात्र तसेच शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

## चिकलठाणा पोलीस स्टेशन येथील फौजदार उत्तम नागरगोजे यांनी अन्याय केल्याप्रकरणी त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी

### भीमशक्ती संघटनेच्या पोलीस अधिक्षक कार्यालयात स्वीय सहाय्यक सुनंदा नितनवरे यांना निवेदन देण्यात आले



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

चिकलठाणा (ग्रामीण) पोलीस स्टेशन येथील फौजदार (PSI) उत्तम नागरगोजे यांनी आपल्या शासकीय पदाचा दुरुपयोग करुन गैरअर्जदार यांच्याशी हात मिळवणी करुन अर्जदार यांच्यावर अन्याय केल्याप्रकरणी त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत करण्यात यावी यासाठी माननीय पोलिस अधिक्षक साहेब (ग्रामीण) पोलीस अधिक्षक कार्यालय भीमशक्ती महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष सौ. मिनाताई मोहन काकडे भीमशक्ती संघटनेच्या वतीने देण्यात आले.

आपल्या आर्थिक स्वार्थापोटी गैरअर्जदार यांना छुप्या पद्धतीने मदत करत आहे. याबाबत चे निवेदन पोलीस अधिक्षक कार्यालय येथे स्वीय सहाय्यक सुनंदा नितनवरे मॅडम यांच्याकडे देण्यात आले यावेळी नितनवरे मॅडम म्हणाल्या की नागरगोजे यांना या संबंधित जे योग्य कारवाई असेल ते करण्यास सांगते सत्य बाजू पडताळून न्याय देण्यात यावा नागरिकांना न्याय मिळवून द्यावा असे म्हणाले. दि.२३/१०/२०२५ रोजी पांडूरंग गोरख दसपूते यांनी चिकलठाणा पोलिस स्टेशन येथे तक्रार अर्ज केला होता. पी.एस.आय. उत्तम नागरगोजे यांच्याकडे तो अर्ज चौकशीसाठी आला असता त्यांनी अर्जदार यांना सुरुवातीला सांगीतले की मी गैरअर्जदार यांना बोलावून त्यांच्यावर कडक कारवाई करतो आणि तुम्हाला न्याय मिळवून देतो. परतू काही दिवसांनी ते अर्जदार यांना बेताल वक्तव्य करुन आरोपी सारखी वागणूक देत आहे. तसेच फोन करून अर्ज बाबत माहिती विचारल्यास उडवाउडवीची उत्तरे देतात नागरगोजे स्वतःला पोलीस आयुक्त समजतात की काय अशा अविर्भावात तेव्हा वावरत असतात. कार्यवाही न झाल्यास संघटनेच्या वतीने लोकशाही पद्धतीने रस्त्यावर येऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे शहर जिल्हाध्यक्ष सतीश नरवडे यांनी सांगितले. मीनाताई काकडे (महिला आघाडी जिल्हाध्यक्ष), शारदाताई निर्मळ (महिला आघाडी जिल्हा उपाध्यक्ष), मधुकरदादा नगराळे (मराठवाडा सचिव), सतीश नरवडे (शहर जिल्हाध्यक्ष) मुन्नाभाई जागीरदार (जेष्ठ नेते) यांच्यासह आदी महिला सदस्यांची उपस्थिती होती. सदरील विषय हा गांभीर्य हाताळून या प्रकरणी पीएसआय नागरगोजे यांच्यावर तात्काळ कायदेशीर कार्यवाही करून तेथील स्थानिक नागरिकांना न्याय देण्यात यावा येत्या १५ दिवसात जर पीएसआय उत्तम नागरगोजे यांच्यावर कायदेशीर कार्यवाही न झाल्यास संघटनेच्या वतीने लोकशाही पद्धतीने रस्त्यावर येऊन तीव आंदोलन छेडण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी, असेही निवेदनात म्हटले आहे..

## दत्त जयंती

दत्त जयंती साजरी करण्यासंबंधाने शास्त्रोक्त असा विशिष्ट विधी आढळून येत नाही. या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. यालाच गुरुचरित्रसप्ताह असे म्हणतात. भजन, पूजन आणि विशेषकरून कीर्तन वगैरे भक्तीचे प्रकार प्रचारात आहेत. महाराष्ट्रात औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर इत्यादी दत्तक्षेत्रांत या उत्सवाला विशेष महत्त्व असते. तामिळनाडूमध्येही दत्त जयंतीची प्रथा आहे. दत्त जयंती या दिवशी काही ठिकाणी दत्तयाग केला जातो.

दत्त जन्माचा इतिहास

अत्रीऋषींची पत्नी अनसूया ही पतीव्रता होती. पातिव्रत्यामुळे तिच्या अंगी एवढे सामर्थ्य आले की, इंद्रादी देव घाबरले आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांकडे जाऊन म्हणाले, ''तिच्या वराने कोणालाही देवांचे स्थान मिळू शकेल किंवा कोणीही देवांना मारू शकेल; म्हणून तुम्ही काहीतरी उपाय करा, नाहीतर आम्ही तिची सेवा करू.'' हे ऐकून त्रिमूर्ती म्हणाले, ''एवढी काय मोठी पतीव्रता, सती आहे, ते आपण पाहू.''

एकदा अत्रीऋषी अनुष्ठानासाठी बाहेर गेल्यावर अतिथींच्या वेशात त्रिमूर्ती आले आणि अनसूयेकडे त्यांनी भिक्षा मागितली. त्यावर अनसूयेने सांगितले, ''ऋषी अनुष्ठानासाठी बाहेर गेले आहेत. ते येईपर्यंत थांबा.'' तेव्हा त्रिमूर्ती अनसूयेला म्हणाले, ''ऋषींना परत यायला वेळ लागेल. आम्हाला खूप भूक लागली आहे. लगेच अन्न द्या, नाहीतर आम्ही दुसरीकडे जाऊ. यआश्रमात आलेल्या अतिथींना तुम्ही इच्छाभोजन देता', असे आम्ही ऐकले आहे; म्हणून इच्छाभोजन करण्यास आम्ही आलो आहोत.'' मग अनसूयेने त्यांचे स्वागत केले आणि जेवायला बसण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ते जेवायला बसले. ती जेवण वाढायला आल्यावर ते म्हणाले, ''तुझे सुंदर रूप पाहून आमच्या मनात अशी इच्छा झाली आहे की, तू विवस्त्र होऊन आम्हाला वाढावेस.'' त्यावर 'अतिथीला विन्मुख पाठवणे अयोग्य होईल. माझे मन निमर्ळ आहे, मग काम देवाची काय बिशाद आहे ? माझ्या पतीचे तपफळ मला तारील', असा विचार करून ती अतिथींना म्हणाली, ''मी तुम्हाला विवस्त्र होऊन वाढीन. तुम्ही आनंदाने भोजन करा.'' मग स्वयंपाकघरात जाऊन पतीचे चिंतन करून तिने विचार केला की, 'अतिथी माझी मुले आहेत' आणि विवस्त्र होऊन वाढायला आली. पहाते तो अतिथींच्या जागी रडणारी तीन लहानबाळे ! त्यांना कडेवर घेऊन तिने स्तनपान करवले आणि बाळांचे रडणे थांबले. इतक्यात अत्रीऋषी आले.

तिने त्यांना सर्व वृत्तान्त सांगितला. ती म्हणाली, ''स्वामिनब देवेन दत्तं ।'' याचा अर्थ असा आहे – 'हे स्वामी, देवाने दिलेली (मुले).' यावरून अत्रींनी त्या मुलांचे नामकरण 'दत्त' असे केले. बाळे पाळण्यात राहिली आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश त्यांच्यासमोर उभे राहिले आणि प्रसन्न होऊन 'वर मागा', असे म्हणाले. अत्री आणि अनसूयेने 'बालके आमच्या घरी रहावी', असा वर मागितला. पुढे ब्रह्मदेवापासून चंद्र, विष्णूपासून दत्त आणि शंकरापासून दुर्वास झाले. तिघांपैकी चंद्र आणि दुर्वास तप करण्यास जाण्यासाठी अनुमती घेऊन अनुक्रमे चंद्रलोकी आणि तीर्थक्षेत्री गेले. तिसरा दत्त विष्णुकार्यासाठी भूतलावर राहिला.

२. पूर्वीच्या काळी भूतलावर स्थूल आणि सूक्ष्म रूपांत अनिष्ट शक्ती मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या. त्यांना दैत्य म्हटले जात असे. देवगणांनी त्या अनिष्ट शक्तींना नष्ट करण्यासाठी केलेले प्रयत्न असफल झाले. तेव्हा ब्रह्मदेवाच्या आदेशानुसार वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या रूपांत दत्त देवतेला अवतार घ्यावा लागला. त्यानंतर दैत्य नष्ट झाले. तो दिवस दत्तजयंती म्हणून साजरा करतात.

श्री दत्त ही पूर्वजांना पुढील गती देणारी देवता आहे. त्यामुळे 'श्री गुरुदेव दत्त ।' हा नामजप नियमित केल्यास पूर्वजांच्या त्रासांपासून आपले रक्षण होते. यासाठी नामजपाचा उच्चार योग्य असणे आवश्यक आहे. 'श्री गुरुदेव दत्त ।' हा नामजप कसा करावा,

# बायको ही सुगरणीसारखी असावी – निसर्ग शिकवतो प्रेम, संयम आणि सहजीवन



'बायको सुगरणीसारखी असावी' याचा अर्थ स्त्रीने सर्व भार उचलावा किंवा फक्त घर सांभाळावे असा अजिबात नाही. उलट, सुगरण पक्षी सांगतो की संसार दोघांनी मिळून बांधला पाहिजे. मादी सुगरण नराने केलेल्या प्रत्येक गाठीला अर्थ देत नाही, ती तिच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या जगण्याच्या निकषांवर निर्णय घेते. मनुष्य स्त्रीही तसाच विचार करतेङ्घतिला सुरक्षितता, आदर, निर्णयात भागीदारी, भावनिक आधार आणि समानतेची अपेक्षा असते. सुगरण पक्षी आपल्याला शिकवतो की स्त्री ही केवळ घर व पिल्ले सांभाळणारी नाही; ती घर पूर्ण करणारी, त्याला उब देणारी आणि त्याला सुंदर बनवणारी सहनिर्माती आहे. म्हणूनच तिला सुगरणी म्हणणे हे तिच्या सामर्थ्याचे कौतुक आहे, तिच्यावर भार टाकणे नव्हे.

**सुगरण** पक्षी म्हणजे निसर्गाचा सर्वात कुशल वास्तुविशारद. त्याची घरटे बांधण्याची कला केवळ सुंदर नाही, तर अत्यंत वैज्ञानिक आणि शिस्तबद्ध आहे. विशेषतः नर सुगरणाने केलेले घरटे जगभरात अभ्यासले जाते. नर सुगरण प्रथम एक अर्धवट घर तयार करतो, ज्याला 'हेल्मेट स्टेज' असे म्हणतात. हे घर पूर्ण नसते; ते फक्त निवड आणि परीक्षणासाठी असते. नर पक्षी अत्यंत मेहनत घेऊन गवत, काड्या, पानांचे तुकडे, बारीक तंतूमय साहित्य गोळा करतो आणि ते गुंफून एक अर्ध-घरटे तयार करतो.

सुगरणाचे हे पहिलं घर केवळ बांधकाम नसतं, तर त्याच्या संसाराची पहिली पायरी असते. हे घर तयार झाल्यानंतर नर पक्षी उत्साहाने मादी सुगरणीला बोलावतो. मादी घरटे बारकाईने पाहते. त्याची मजबुती, रचना, सुरक्षितता, दिशानिर्देश, वारा-पावसापासून संरक्षण, उंची, लवचिकता आणि बसण्याची सोय तपासते. तिच्या निरीक्षणात नराने केलेल्या प्रत्येक गाठीला, प्रत्येक तेंड्याला आणि घराच्या प्रवेशद्वाराच्या कोनालाही अर्थ असतो. जर तिला ते घर पसंत पडले, तरच ती नराशी संबंध स्वीकारते. अन्यथा ती नकार देऊन पुढे जाते आणि नराला पुन्हा सुरुवातीपासून नवीन घरटे बांधावे लागते. ही प्रक्रिया कधीकधी अनेक वेळा चालते, जोपर्यंत योग्य घर तयार होत नाही.




मादीची पसंती मिळाली की नर सुगरणास जणू नवा उत्साह येतो. आता ते दोघे मिळून घरटे पूर्ण करतात. नर मुख्य बाह्य संरचना मजबूत करतो, तर मादी आतील भाग अधिक उबदार, आरामदायी आणि सुरक्षित बनवण्याचे काम करते. घरटे पूर्ण झाल्यानंतरच त्यांचा संसार सुरू होतो. अंड्यांचे पालनपोषण, पिल्लांची वाढ, त्यांचे संरक्षणङ्घही सर्व जबाबदारी नर व मादी दोघेही वाटून घेतात. हे निसर्गातील सहजीवनाचे आदर्श उदाहरण आहे.

हेच रूपक मानवी जीवनातही तंतोतंत लागू होते. मानवसुद्धा विवाहाच्या नात्यात प्रवेश करण्याआधी 'अर्धघर' तयार करतो. हे अर्धघर म्हणजे व्यक्तिम त्त्व, आर्थिक स्थैर्य, भावनिक तयारी, विचारांची परिपक्कता, मूल्यांची स्थापनशीलता आणि जबाबदारी स्वीकारण्याची इच्छाशक्ती. सुगरण पक्षी सांगतो की संसार केवळ दोन लोकांच्या एकत्र राहण्यावर टिकत नाही; तो टिकतो परस्पर योगदानावर. पुरुषाने आपले जीवन एक स्थिर पाया बनवणे हे सुगरणाच्या 'अर्धघर' बांधण्यासारखेच आहे. त्याचप्रमाणे स्त्रीचीही भावनिक परिपक्कता, समजूतदारपणा, करुणा आणि कुटुंबाला साथ देण्याची तयारी हे तिचे 'अर्धघर' आहे.

आजच्या घाईगडबडीच्या जगात अनेक जण म्हणतात की विवाह कठीण आहे, संसार सांभाळता येत नाही, लोक समजून घेत नाहीत. पण निसर्गातील एक छोट्या सुगरणालासुद्धा संसारासाठी किती परीक्षा द्याव्या लागतात: घरटे बांधणे, कित्येक वेळा नकार मिळणे, पुन्हा सुरुवात करणे, आणि योग्य साथीदार मिळाला की आनंदाने घर पूर्ण करणे. आपल्याकडे तर बुद्धिमत्ता, भाषा, समाज, संस्कृती, संधी आणि समर्थन प्रणाली आहे; मग आपण इतक्या लवकर का खचतो? सुगरण पक्षी शिकवतो की योग्य जोडीदार मिळणे ही अवघड परीक्षा नसून नैसर्गिक प्रक्रिया आहे.



– डॉ. भारत कऱ्हाड,
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय
दापोली, जिल्हा रत्नागिरी.

एका सुगरणीला घर पूर्ण करण्यासाठी जितका उतारा आवश्यक आहे तितकाच नराचा श्रम महत्त्वाचा असतो. तिचे निरीक्षण, तिची निवडणूक प्रक्रिया आणि तिचा अंतिम निर्णय हे त्या घराचा भविष्यकाळ ठरवतात. हे मानवी जगातही तंतोतंत लागू होते. संसार म्हणजे केवळ आर्थिक व्यवस्थापन नव्हे, तर दोन मनांच्या भावनिक आणि मानसिक जुळणीतून निर्माण होणारे घर. सुगरण पक्षी शिकवतो की लग्न ही स्पर्धा नाही; ती दोन जीवांची परस्पर सहकार्यात घडलेली कलाकृती आहे. बहुतेक वेळा आपण म्हणतो की माणूसच खूप गुंतागुंतीचा आहे. पण खरं तर गुंतागुंती आपल्याच अपेक्षांमध्ये आहे. निसर्गात प्रत्येक नात्याची एक संरचना आहे. योग्य साथीदार, योग्य घर, योग्य प्रयत्न आणि योग्य काळजी. आपल्या संसारातही हे चार घटक असतील तर घराला कोणी तोडू शकत नाही. सुगरण पक्षी आपल्याला सांगतो की संसार सुरू करण्याआधी मन तयार असावे; अर्धघर तरी बांधलेले असावे. स्वतःची ओळख, स्वभाव, स्वप्ने, जबाबदाऱ्या यांची नीट जाण असावी. त्यानंतर योग्य साथीदार मिळाल्यावर दोघांनी मिळून घर पूर्ण करायचे. हेच विवाहाचे खरे विज्ञान आहे.

स्त्री जर सुगरणीसारखी असेल. कुटुंबाला उबदारपणा देणारी, घराचे सौंदर्य वाढवणारी, मुलांना प्रेमाने वाढवणारी, मृदू पण मजबूत स्वभावाची तर संसार निश्चितच सुंदर होतो. पण पुरुषही सुगरणासारखा असावा मेहनती, जबाबदार, सहकार्य करणारा, समजूतदार आणि आपल्या कुटुंबाला सुरक्षितता देणारा. हे दोन्ही घटक जिथे असतात तिथे संसार केवळ टिकत नाही, तर फुलतो. अखेरीस, सुगरण पक्षी म्हणतो की विवाह म्हणजे दोन लोकांनी एकत्र बांधलेली सर्वोत्तम कलाकृती आहे. निसर्गाचे हे रूपक आपल्या समाजाला एक अद्भुत संदेश देते. लग्न म्हणजे अर्धवट घर पूर्ण करण्याची संयुक्त यात्रा. नराने विणलेले अर्धघर आणि मादीने दिलेली अंतिम निवड ही प्रक्रिया आपल्याला शिकवते की दोघेही समान, दोघेही आवश्यक आणि दोघेही संसाराचे सहनिर्माते आहेत.

## देशासाठी बलिदान देणाऱ्यांच्या स्मृती जपणे आणि त्यांच्या वारशाची ज्योत पुढील पिढीपर्यंत पोहचवणे हीच खरी कृतज्ञता -आमदार संजय केनेकर




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

मराठवाडा स्वातंत्र्य सैनिक पाल्य संघटनेचा मेळावा साखरे मंगल कार्यालय उत्साहपूर्ण छत्रपती संभाजीनगर येथे वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे प्रदेश महामंत्री व आमदार संजय केणेकर साहेब यांनी मुख्य उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढविली. देशासाठी बलिदान देणाऱ्यांच्या स्मृती जपणे आणि त्यांच्या वारशाची ज्योत पुढील पिढीपर्यंत पोहचवणे हीच खरी कृतज्ञता.

स्वातंत्र्याच्या अमूल्य वारशाचे संगोपन आणि राष्ट्रनिर्मितीतील पिढीजात योगदान अधोरेखित करणाऱ्या या मेळाव्यात स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबीयांची उपस्थिती विशेष प्रेरणादायी ठरली. यावेळी प्रमुख उपस्थिती स्वातंत्र्य सैनिक बहिणाराव जयस्वाल, श्री. वसंतभाऊ देशमुख, जगतसिंग परिहार, श्री. बाळासाहेब कोलते, श्री. आबासाहेब शिंदे, श्री. संजय जयस्वाल, श्री. बाळासाहेब चोंदे, श्री. कडूबा लोखंडे, श्री. एकनाथ इंगळे, श्री. अशोक पुंगळे तसेच स्वातंत्र्य सैनिक पाल्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशासाठी बलिदान देणाऱ्यांच्या स्मृती जपणे आणि त्यांच्या वारशाची ज्योत पुढील पिढीपर्यंत पोहचवणे हीच खरी कृतज्ञता.

## पुण्यातील पंचतारांकीत हॉटेलला बॉम्बने उडवण्याची धमकी; पोलिसांची धावपळ, कॉल करणारा जेरबंद

**पुणे (अट्टल मत प्रतिनिधी)**

कोरेगाव पार्कमधील एका प्रसिद्ध पंचतारांकित हॉटेलला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर शुक्रवारी दुपारी मोठी खळबळ उडाली. हॉटेलच्या लँडलाईनवर आलेल्या फोनवर 'हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवला आहे, तात्काळ हॉटेल रिकामे करा' अशी धमकी देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि बॉम्ब शोधक पथक तात्काळ हॉटेलवर दाखल झाले.

हॉटेलची कसून तपासणी करण्यात आली. मात्र, कोणतीही संशयास्पद वस्तू न आढळल्याने हा कॉल 'फेक' असल्याचे स्पष्ट झाले. अचानक झालेल्या या गोंधळानंतर हॉटेलमधील कर्मचारी आणि ग्राहकांनी सुटकेचा निश्वास टाकला. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा कॉल एका म ोबाईल क्रमांकावरून करण्यात आला होता. प्राथमिक तपासानंतर संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी हॉटेलच्या सिक्युरिटी मॅनेजरने कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून ९८३२२५२५१७ या मोबाईल क्रमांकावरून धमकी दिल्याचे नमूद केले आहे. खोडसाळ पद्धतीने केलेला हा प्रकार कोणत्या हेतूने करण्यात आला, याचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# मराठवाड्यातील नामांकित प्राचार्यांच्या यादीत नाव राहील असे प्राचार्य डॉ. तेजनकर यांचे कार्य - श्री.त्रिंबकराव पाथ्रीकर



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

२९ नोव्हेंबर २०२५ मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर यांचा सेवागौरव समारंभ शनिवारी (दि.२९) रोजी आयोजित करण्यात आला. डॉ. अशोक तेजनकर हे गेल्या ३६ वर्षापासून अध्यापन, संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. १९९० पासून देवगिरी महाविद्यालयात प्राध्यापक तर सहा वर्षांपासून प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. तर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात २७ फेब्रुवारी २०१८ ते ३ जून २०१९ या काळात प्रकुलगुरू म्हणून कार्य केले. तसेच महाविद्यालयात विभागप्रमुख, भूगर्भशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष, अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून कार्य केले आहे. तसेच बामुक्टो संघटनेत सक्रिय कार्य केले आहे.

महाविद्यालयाच्या सेवेतून ते ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त होत आहेत. या निमित्त सुरवातीला मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.आ. सतीश चव्हाण यांनी त्यांचा सत्कार केला. त्यानंतर सेवागौरव कार्यक्रमामध्ये म.शि.प्र. मंडळ केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री.त्रिबकराव पाथ्रीकर यांच्या हस्ते सपत्नीक गौरव करण्यात आला. याप्रसंगी म. शि प्र मंडळाचे उपाध्यक्ष श्री. सलीम शेख तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री. विवेक भोसले, डॉ. प्रकाश भांडवलदार, महाविद्यालय विकास समिती सदस्य डॉ.आदित्य येळीकर, निमंत्रित सदस्य श्री.विवेक जैस्वाल, म. शि प्र मंडळाचे जेष्ठ सदस्य श्री.द्वारकादास पाथ्रीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.त्रिंबकराव पाथ्रीकर होते. याप्रसंगी श्री.विवेक भोसले, श्री.द्वारकादास पाथ्रीकर आदी मान्यवरांनी प्राचार्य अशोक तेजनकर यांच्या प्रशासकीय कारकिर्दीबद्दल गौरवोद्गार काढले. प्राचार्य तेजनकर यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासंबंधी रोजगार पूरक विद्यार्थी निर्माण करण्यासंबंधी अनेक उपक्रम महाविद्यालयात राबवले. त्यांच्या कार्यकाळात गरजाभिमूख अभ्यासक्रम त्यांनी सुरु केले. द्वारकादास पाथ्रीकर यांनी प्राचार्य तेजनकर यांच्या मितभाषी प्रशासन कौशल्यावर भाष्य केले.

आपल्या अध्यक्ष समारोपमध्ये बोलताना श्री.त्रिंबकराव पाथ्रीकर यांनी प्राचार्य तेजनकर यांच्या कार्यकाळात नॅक अ++ ग्रेड संपादन केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील देवगिरी महाविद्यालय हे पारंपारिक अभ्यासक्रम राबवणारे पाहिले स्वायत्त म हाविद्यालय ठरले. तसेच अनेक व्यावसायिक अभ्यास क्रम सुरु करण्यात आले. प्राचार्य तेजनकर यांनी प्राचार्य गंगाधरराव पाथ्रीकर, प्राचार्य चिखलीकर, प्राचार्य ना.य.डोळे यांची कार्य परंपरा पुढे चालवली असे मत त्यांनी व्यक्त केले. आपल्या सेवागौरव निमित्त सत्कार प्रसंगी म नोगत व्यक्त करताना प्राचार्य अशोक तेजनकर असे म्हणाले त्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि संशोधन कामगिरी मध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ कार्यकारिणी यांची भूमिका महत्वाची आहे. म. शि. प्र. मंडळाचे सरचिटणीस मा.आ. सतीश चव्हाण आणि महाविद्यालय विकास समि तीचे ज्येष्ठ सदस्य श्री. पंडितराव हर्षे यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे आणि त्यांच्या पाठबळामुळे मला देवगिरी म हाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणून भरीव कामगिरी करण्याची संधी मिळाली.व महाविद्यालयास नॅक चा अ++ दर्जा, स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा आणि व्यवसायिक कोर्से स सुरु करता आले. ग्रामीण भागातील विद्यार्थी म्हणून सुरु झालेला प्रवास विद्यापीठाच्या प्र- कुलगुरू पदापर्यंत येऊन पोहचला ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. ऐ.आर. शेळके, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते, डॉ.अरुण काटे आणि डॉ.शिवानंद भानुसे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी तसेच शहरातील मान्यवरांची उपस्थिती होती. त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. सुलक्षणा जाधव यांनी केले.

# न्याय, समता, स्वातंत्र्य,या शिवरायांच्या त्रिसुत्रीमुळे छत्रपती शिवाजी महाराज जगभरात आदर्श राजे म्हणून प्रसिध्द

## आदित्य जीवने,सह व्यवस्थापकीय संचालक यांचे प्रतिपादन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य वीज तांत्रीक कामगार सहकारी पतसंस्थेचे कार्यालय, खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण महावितरण कंपनीचे सह व्यवस्थापकीय संचालक श्री.आदित्य जीवने, भा.प्र.से यांच्या शुभहस्ते झाले, या कार्यक्रमाचे औचित्य आणि महात्मा पुफ्ले यांच्या पुण्यतिथी निमित्त महात्मा पुफ्ले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या अनावरण प्रसंगी मार्गदर्शन करतांना सह व्यवस्थापकीय संचालक मा.श्री.आदित्य जीवने म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्याय, समता, स्वातंत्र्य या त्रिसुत्रीमुळे स्वराज्य उभे राहीले आणि जगाने छत्रपती शिवाजी महाराजाच्या स्वराज्याची दखल घेतली आणि या जाणत्या राजाचा पुर्णाकृती पुतळा कार्यालयात विराजमान केल्याबद्दल सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन करतो.

संस्थेच्या वतीने आयोजीत या अनावरण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री.ज्ञानेश्वर मोरे हे होते तसेच प्रमुख पाहूणे म्हणून महावितरण कंपनीचे पुणे प्रादेशिक कार्यालयाचे प्रादेशि संचालक मा.श्री.भुजंग खंदारे,मुख्य अभियंता मा.श्री.पवनकुमार कछोट, महापारेषण कंपनीचे मुख्य अभियंता मा.श्री.जयंत विखे, अधिक्षक अभियंता शहर मंडळ मा.श्री.मनिष ठाकरे, महापारेषण कंपनीच्या अधिक्षक अभियंता मा.श्रीमती अंजना ठक्कर, कार्यकारी अभियंता मा.श्री.प्रसाद महातोले, मा.श्री.महेंद्र देशमुख, संघटनेचे अध्यक्ष मा.श्री.भाऊसाहेब भाकरे, सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन, सल्लागार आर.पी.थोरात, ताराचंद कोल्हे मामा, श्रावण कोळनूरकर,उपाध्यक्ष अजिज पठाण उपसरचिटणीस बी.डी.पाटील,के.कोषाध्यक्ष भानुदास शेवाळे, उपसरचिटणीस तथा संस्थेचे संचालक कैलास गौरकर, संघटन सचिव तथा संचालक विश्वंभर लोखंडे,संस्थेच्या उपाध्यक्षा श्रीमती सलमा शेख, सचिव जितेंद्र हाडे, खजिनदार संजयकुमार शाहीर, संचालक शेख रफिक, दिपक थट्टेकर, सुधाकर दौड, भरत नळगे, उध्दव मुंढे, शेख मुस्ताक, सौ.सिमा मोहिते, तज्ञ संचालक सि.एम.साळूंके, कार्यकारी संचालक शेख शौकत, यांची व्यासपीठावर उपस्थिती होती सर्व मान्यवरांचा संस्थेच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दीन यांनी केले आणि संस्थेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा अनावरण करण्याचा उद्देश विशद केला,या प्रसंगी कें.अध्यक्ष भाऊसाहेब भाकरे यांनी संघटनेच्या अधिपत्याखाली असलेल्या महाराष्ट्रातील सर्व पतसंस्थांमध्ये सर्व महामानवांचे तैलचित्र आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा असावा कारण उत्तम प्रशासक आणि जनतेची काळजी करणारे जाणते राजे यांच्या विचारांनी कार्यालयात कामे होतील अशी आशा व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संचालक मंडळ, आणि कर्मचारी नंदकिशोर लोखंडे आणि मनोज चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिव जितेंद्र हाडे व उपसरचिटणीस तथा संचालक कैलास गौरकर यांनी केले तर आभार संचालक शेख मुस्ताक यांनी मानले..

# २६/११ हल्ल्यात शहीद जवानांचे पोलीस वेलफेअर असोसिएशन व पोलीस पब्लिक अकॅडमीतर्फे स्मरण

## 'भारत माता की जय', 'शहीद जवान अमर रहे, अमर रहे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

२६ नोव्हेंबर २००८ रोजी दहशतवाद्यांनी मुंबई शहरात एकत्रितपणे दहा प्रमुख ठिकाणी हल्ले करून देशाला हादरवून सोडले होते. या भीषण हल्ल्यात १८ सुरक्षा कर्मचाऱ्यांसह १६६ पेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर ३४ परदेशी नागरिकांसह सुमारे ३०० हून अधिक नागरिक गंभीर जखमी झाले होते. या हल्ल्यात जिवंत पकडलेल्या दहशतवादी अजमल कसाबवर खटला चालवून त्याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आणि २१ नोव्हेंबर २०१२ रोजी पुण्यातील येरवडा कारागृहात त्याची फाशी देण्यात आली. या काळ्या दिवसाच्या पार्श्वभूमीवर, छत्रपती संभाजीनगर येथील टीव्ही सेंटर परिसरात पोलीस वेलफेअर असोसिएशन व पोलीस पब्लिक अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने २६/११ हल्ल्यात शहीद झालेल्या

**“ माझे व्हिजन हे स्पष्ट आणि पारदर्शक आहे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांनी उच्च अधिकारी होण्यासाठी स्वतःचा फायदा करून घेतला पाहिजे. माझे जसे विचार आहेत तसे सर्वांचे असतीलच असे नाही, प्रामाणिकपणे समाजात बदल घडविण्याची माझी इच्छा आहे. - बालाजी सोनटक्के**






कर्तव्यदक्ष अधिकारी व पोलीस जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमात शेकडो विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

जयस्वाल हॉल ते टीव्ही सेंटर या मार्गावर काढण्यात आलेल्या कॅन्डल मार्चमध्ये 'भारत माता की जय', 'शहीद जवान अमर रहे, अमर रहे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. उपस्थित नागरिकांनी पोलीस वेलफेअर असोसिएशन व पोलीस पब्लिक अकॅडमी यांच्या समाजोपयोगी कार्याचे कौतुक केले. पोलीस प्रबोधिनीच्या माध्यमातून सक्षम व गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडवण्याचा माझा सातत्याने प्रयत्न राहील. देशसेवा आणि समाजसेवेसाठी आम्ही अहोरात्र परिश्रम घेत असून, एक दिवस नक्की क्रांती घडवू, असे त्यांनी स्पष्ट केले.

हा कार्यक्रम शहरात देशभक्तीची भावना अधिक दृढ करणारा व सम ाजप्रबोधनाचा आदर्श उपक्रम ठरला. सदर कार्यक्रमासाठी माजी डिवायएसपी रामनाथ चोपडे, प्रा. उतकर, सामाजिक कार्यकर्ते सुरेश गवळी, प्रा. रवींद्र सरकार, शिक्षक भारती संघटनेचे श्री दाणे सर, बालाजी म ाने, अॅड. चंद्रकांत गोरे, श्री रघुनाथ पदमे, संजय चिकसे, राजू डोंगरे, विनोद पूर्भे यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पोलीस वेल्फेअर असोसिएशनचे दीपक गोफणे व पोलीस पब्लिक अकॅडमी तसेच टीव्ही सेंटर परिसरातील सर्व अकॅडमीचे संचालकांनी परिश्रम घेतले.

### बहुजन समाजातील विद्यार्थी उच्च पदस्थ अधिकारी व्हावेत

“ समाजसेवक व समाजसुधारक बालाजी सोनटक्के (माजी सहाय्यक पोलीस आयुक्त) यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, शाहू, फुले, आंबेडकर यांचे प्रेरणादायी विचार बहुजन समाजापर्यंत पोहोचवणे आणि रुजवणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. याच भूमिकेतून आम्ही पोलीस पब्लिक अकॅडमी ची स्थापना केली आहे. या माध्यमातून तरुण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि चांगले संस्कार देता यावेत, तसेच बहुजन समाजातील विद्यार्थी उच्च पदस्थ अधिकारी व्हावेत हीच आमची इच्छा आहे.

# साई बाबा मी शिर्डीला पायी चालत येईल...

## साई ग्रुप, कैलासनगर - छत्रपती संभाजीनगर छत्रपती संभाजीनगर ते शिर्डी पालखी सोहळा भक्तिमय उत्साहात शानदार प्रस्थान





**पालखी सोहळ्याची वैशिष्ट्ये**

- आकर्षक फुलांनी सजवलेली पालखी
- ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदंगासह भक्तिगीतांचा निनाद
- मार्गातील सर्व भक्तांना महाप्रसादाचे वितरण. महिलांसाठी विशेष सुविधा व सुरक्षा व्यवस्था.

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) - कैलासनगर येथील साई ग्रुप तर्फे दत्त जयंती निमित्त छत्रपती संभाजीनगर ते शिर्डी पालखी सोहळा व भव्य शाल अर्पण सोहळ्याचे रविवारी दिमाखात आणि भक्तीमय वातावरणात प्रस्थान झाले. परिसरातील नागरिक, महिलावर्ग, तरुणांपासून ज्येष्ठ भक्तांपर्यंत हजारो भाविकांच्या उपस्थितीत या यात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले. २९ नोव्हेंबरला प्रस्थान ते ४ डिसेंबरपर्यंत सांगता होईल.

या सोहळ्याचे संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवला जात असून यंदा देखील तो मोठ्या उत्साहात पार पडला. सामाजिक बांधिलकी, धार्मिक श्रद्धा आणि सेवा या त्रिसूत्री उद्दिष्टांवर आधारित या पालखी सोहळ्याने परिसरातील भक्तांमध्ये नवचैतन्य निर्माण केले आहे.

**साई भक्तांसाठी पायी दिंडीचे आयोजन**

साई ग्रुपचे कार्यकर्ते सोहळ्याचे प्रमुख शिल्पकार या भव्य आयोजनात खालील कार्यकर्त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली गणेश बोयने, गणेश शिरसाठ, आकाश थोरात, शिवा ठाकरे, रवी राऊत, रवींद्र आडने, किरण डाखोरकर, अजय खांडेकर, किशोर शेरे, अविनाश बारसे, मंगेश आडने, अरुण बोयने, समर्पण, शिस्तबद्ध नियोजन आणि भक्तीभावाने काम करणाऱ्या या सर्व कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे संपूर्ण सोहळा अत्यंत सुरळीत आणि उत्साहवर्धक पार पडला.

**भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग**

पालखी प्रस्थानापूर्वी सकाळी विशेष पूजा, आरती आणि प्रसादाचे आयोजन करण्यात आले. सोहळ्याला परिसरातील संत-महंत, मान्यवर, सामाजिक संघटना तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. 'साईनाथ महाराज की जय' च्या जयघोषांनी वातावरण भक्तिमय झाले.

**सेवा हीच पूजा - साई ग्रुपचा संदेश**

समाजातील धार्मिक सलोखा, सामूहिक बांधिलकी व युवकांमध्ये सेवा संस्कृती रुजवणे हे साई ग्रुपचे प्रमुख ध्येय असल्याचे संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ वाडेकर यांनी यावेळी सांगितले. साईच्या चरणी ही दिंडी, सेवाभावातूनच पुढे नेऊ, असा निर्धार ग्रुपच्या सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

पान १ वरून

## राज्यातील २० नगरपालिकांमध्ये निवडणुका पुढे ढकलल्या

लक्ष या सुधारित कार्यक्रमाकडे लागले होते. न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांमुळे बाधित झालेल्या नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आयोगाने खालीलप्रमाणे सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे

**चंद्रपूर** - जिल्ह्यातील घुग्गुस नगर परिषदेची निवडणूक पुढे ढकलण्यात आल्याची आणि आता या निवडणुकीची प्रक्रिया ४ डिसेंबर ते २० डिसेंबर दरम्यान राबविण्यात येणार असल्याची जिल्हाधिकाऱ्यांची प्राथमिक माहिती आहे. यासोबतच गडचांदूर नगरपरिषदेतील प्रभाग क्रमांक ८ ब आणि मूल नगर परिषदेतील प्रभाग क्रमांक १० ब येथील उमेदवारांनी न्यायालयात अपील दाखल केल्याने आणि याबाबत अंतिम निकाल न आल्याने येथील निवडणुका देखील पुढील निर्णयापर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत.

**अकोला** - राज्यातील निवडणुक प्रक्रिया स्थगित झालेल्या २० नगरपालिकांमध्ये अकोला जिल्ह्यातील बाळापूर नगरपालिकेचा समावेश आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराबाबत न्यायालयीन याचिका प्रलंबित असल्याने निर्णय. नगराध्यक्ष पदासह सर्व २५ जागांची निवडणूक स्थगित करण्यात आल्या आहेत. आता २० डिसेंबरला येथे निवडणूक होणार आणि २१ डिसेंबरला मतमोजणी. निवडणूक स्थगित झाल्याने राजकीय पक्ष आणि कार्यकर्त्यांच्या उत्साहावर विरजण पडले आहे.

**नांदेड** - नांदेडमधील मुखेड आणि धर्माबाद नगरपालिकेची निवडणूक पुढे ढकलली. आता, येथील निवडणुकांसाठी २३ तारखेला मतदान होणार असून २४ तारखेला मतमोजणी आहे. जिल्ह्यातील १३ नगरपालिकेपैकी २ नगरपालिकेच्या निवडणुका पुढे ढकलल्या. तर भोकर, कुंडलवाडी आणि लोहा नगरपालिकेतील एका एका जागेवर निवडणूक पुढे ढकलण्यात आलीय.

**पुणे** - पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील १२ जागांच्या निवडणुका स्थगित करण्यात आल्या आहेत. तळेगाव आणि लोणावळ्यातील प्रत्येकी ६ जागांचा यामध्ये समावेश आहे. आमदार सुनील शेळकेंच्या बंधूच्या जागेची देखील निवडणूक पुढं ढकलली. पुण्यातील मावळ तालुक्यात दोन नगरपरिषदांमधील १२ जागांच्या निवडणुका स्थगित करण्यात आल्यात. त्यात तळेगाव आणि लोणावळ्यातील प्रत्येकी सहा जागांचा समावेश आहे. अजित पवारांचे आमदार सुनील शेळकेंचे बंधू सुदाम शेळके उभे असलेल्या प्रभाग क्रमांक ८ ब ची ही निवडणूक पुढं ढकलण्यात आली आहे. त्यामुळे, आता या १२ जागांवर २९ डिसेंबरला मतदान प्रक्रिया पार पडेल.

न्यायालयात अपील झाल्यानं निवडणूक आयोगाने हा नवा कार्यक्रम जाहीर केला आहे. लोणावळा प्रभाग १० अ आणि प्रभाग ५ ब पुढे ढकलण्यात आली आहे. तर तळेगाव दाभाडे नगरपरिषद मधील प्रभाग क्रमांक २ अ, ७अ, ७ब, ८ अ, ८ब, १०ब पुढे ढकलण्यात आली आहे.

बारामती - बारामतीतील नगराध्यक्षांच्या निवडणुकीसह काही प्रभागातील सात जागांचा विचार करून ही निवडणूक प्रक्रिया आता २० डिसेंबर रोज पर्यंत पुढे ढकलली आहे.

साहजिकच नगराध्यक्षपदाचाही यामध्ये समावेश असल्याने बारामतीचे नगरपरिषदेचे मतदान थेट २० डिसेंबर रोजी घेतली जाणार आहे. त्यामुळे नगराध्यक्ष पदासह ज्या सात जागांसाठी सत्र न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती, त्या ठिकाणी उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे.

# 'शिवछत्रपती'च्या रूपाने महाराजांच्या विचारांचा 'डिजिटल पुनर्जन्म'; एआयने जिवंत केला शिवकाळ

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मराठी चित्रपटसृष्टीत इतिहास आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा एक अद्भुत संगम पाहायला मिळणार आहे. आपला इतिहास नव्या पिढीपर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पोहोचवावा या उद्देशाने, देशातील पहिला संपूर्ण एआय आधारित (कृत्रिम बुद्धिमत्ता) ऐतिहासिक चित्रपट 'शिवछत्रपती' प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

या चित्रपटाची संकल्पना आणि दिग्दर्शन सुकन्या तुपे-सावंत यांनी केले आहे. या चित्रपटाद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना, त्यांचे विचार आणि प्रेरणा जिवंत स्वरूपात सादर करण्यात आल्या आहेत.

हा संपूर्ण चित्रपट एआय तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार करण्यात आला आहे. युद्ध प्रसंग, तत्कालीन दुर्ग, पोशाख आणि त्या काळातील वातावरण अत्यंत वास्तवदर्शी व्हिज्युअलमध्ये साकारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत घेण्यात आली आहे.

चित्रपट निर्मितीसाठी तब्बल पाच महिन्यांचा कालावधी लागला असून, या प्रकल्पामागे यतिन शिंदे, अर्जुन शेरे, आदित्य सावंत, आदिल व शरयू यांची संपूर्ण टीम कार्यरत आहे. फोटो पासून व्हिडीओ बनवण्यासाठी लिओनार्डो, इडिओग्राम, मेटा आदी साईटची मदत घेण्यात आली आहे.

**'महाराजांच्या विचारांचा डिजिटल पुनर्जन्म'**

हा चित्रपट केवळ ऐतिहासिक घटनांची उजळणी नसून, 'शिवाजी महाराजांच्या विचारांचा डिजिटल पुनर्जन्म' आहे. चित्रपटात महाराजांची प्रशासकीय कुशलता, स्त्रियांबद्दलचा आदर, तसेच शाहिस्तेखानावर केलेली 'सर्जिकल स्ट्राईक' अशा अनेक प्रेरणादायी घटनांचा समावेश आहे. 'शिवछत्रपती' हा मराठी संस्कृती, इतिहास आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा सुंदर संगम असून, तो मराठी सर्जनशीलतेचा नवा अध्याय ठरणार आहे.






### एआय नव्हे रिअलमध्ये शूट केल्याचा अनुभव

"एआयच्या माध्यमातून वेगवेगळ्या वेबसाईटवर फोटो टाकून त्यांना कमांड देऊन व्हिडीओ तयार केले आहे. वाद्य आणि अनेक ठिकाणी आवाज देखील एआयचा वापरला आहे. विशेष म्हणजे काही ठिकाणाचा व्हॉइस ओव्हर वगळता सर्व चित्रपट हा एआयनेच तयार केला आहे. मात्र हा चित्रपट पाहताना एआयचा न वाटता रिअल मध्ये शूट केल्याचा अनुभव येतो.

**सुकन्या तुपे- सावंत, निर्माता**

एआय-आधारित आवाज, पार्श्वसंगीत आणि थ्रीडी व्हिज्युअल प्रेक्षकांना थेट शिवकाळात घेऊन जातील. हा फक्त चित्रपट नाही, तर स्वराज्याच्या विचारांचा आधुनिक अनुभव आहे, असा दावा निर्मात्यांनी केला आहे.

## विशाल राठोड 'डिजिटल काँट्रीब्युशन' पुरस्काराने सन्मानित

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

डिजिटल क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबदल शहरातील विशाल राठोड (लाला) यांना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते भारतरत्न 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राईज फॉर डिजिटल काँट्रीब्युशन हा पुरस्कार मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

छत्रपती संभाजी नगर येथील विशाल राठोड (लाला) हे सिनेक्षेत्रात कार्यरत आहे. त्यांचे विविध अल्बम तसेच चित्रपट निर्मिती क्षेत्रात योगदान असून ते डिजिटल कलावंत, अभिनेता म्हणून प्रसिद्ध आहेत. हा पुरस्कार रामदास आठवले व त्यांच्या टीमने संपूर्ण महाराष्ट्रभरातून सोशल मीडियावर असलेले १६ क्रियेटर निवडले होते. यापैकी एक नाव छत्रपती संभाजी नगर मधील युवा विशाल विलास राठोड (लाला) यांच आहे. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या यूट्यूब चैनल वर या कार्यक्रमाचे थेट प्रेक्षेपण करण्यात आले होते.

जगभरातून या कार्यक्रमाला ६० ते ७० हजार डिजिटल प्रेक्षकांनी आपली उपस्थिती दर्शवली. विशाल राठोड यांच्या या यशाबद्दल त्यांचे मित्र, नातेवाईक व हितचिंतकांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांचे अभिनंदन केले आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199